**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अच्युत श्रीकृष्ण राशिवडेकर
३५० डी, रंकाळा वेस, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर,
जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | १०.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर,
जि. कोल्हापूर

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

तपोवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या चालू संचालक मंडळाची व त्याच्या पूर्वीच्या संचालक मंडळानी दिलेल्या बंधपत्राच्या प्रती

## विवेचन

तपोवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकांच्या बंधपत्रांच्या प्रती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ती श्री. अच्युत श्रीकृष्ण राशिवडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तपोवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या आजी व माजी संचालकांच्या बंधपत्रांची संस्थेच्या स्थापनेपासूनची माहिती आपण दि. ६.२.२००७ रोजी मागितली होती. परंतु माहिती संस्था स्तरावरील असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले, तसेच माहिती देण्यासाठीचा अर्ज संस्थेकडे वर्ग केला. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. संजय सि.रानगे यांनी अपील अंशत: मान्य केले व माहिती देण्याचे आदेश संस्थेला देऊन अपीलकर्त्याला त्वरित माहिती विनामूल्य प्राप्त करून देण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग यांनी संस्थेला निर्देश दिले. तरीही माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. राशिवडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १३.५.३२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे संस्थेने श्री. राशिवडेकर यांना कळविले व उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे माहिती पाठविली, तसेच दि. २५.१.२००८ रोजी श्री. राशिवडेकर यांना टपालाने माहिती पाठविली. परंतु आपल्याला पूर्वीच्या संचालकांच्या बंधपत्रांची माहिती मिळाली नाही, आताच्या संचालकांची माहिती मिळाली, असे श्री. राशिवडेकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. त्याचाच त्यांनी पुनरूच्चार केला. सदरची संस्था १९८८ मध्ये सुरू झाली असून आपण गेल्या ३ वर्षांपासून काम करीत आहोत. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही तरीही आपल्याकडील माहिती दिली, असे निवेदन तपोवन नागरी सहकारी पतसंस्था, कोल्हापूरचे व्यवस्थापक श्री. ए.एन. होसूरकर यांनी केले. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिले, त्यानुसार संस्थेने त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रांची माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी श्री. अरूण पां. काकडे यांनी नमूद केले. पूर्वीची माहिती देण्यासाठी आयोगाने

मुदत देऊ केली असता अपीलकर्ता श्री. राशिवडेकर यांनी 'आपल्याला माहिती मिळण्याची वेळ टळून गेली आहे, त्यामुळे आता माहितीची गरज नाही,' असे सांगितले. हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय रामचंद्र माने
रा. राजवाडा,मु.पो. कुरूंदवाड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा
जिल्हाधिकारी, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | १०.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दत्तात्रय रामचंद्र माने
रा. व.सा.जनसेवा, कुरूंदवाड, जि.कोल्हापूर

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे तेरवाड ता.कुरुंदवाड, जि.कोल्हापूर येथील गट नं. ५४९/ब दगड व मुरूम काढण्यासाठी शासनाने ताब्यात घेतलेली जमीन परत मिळणेबाबत व जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी केलेल्या कार्यवाही -बाबतची माहिती

## विवेचन

दगड व मुरूम काढण्यासाठी शासनाने ताब्यात घेतलेली मौजे तेरवाड, ता.कुरुंदवाड, जि.कोल्हापूर येथील आपली जमीन मूळ मालकाला (म्हणजे आपल्याला) हस्तांतरण करण्यास हरकत नसल्याचे

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी दि. २३.८.२००६ रोजी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविले. ती जमीन आपल्याला मिळाली नाही, म्हणून आपण जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना तीन स्मरणपत्रे पाठविली. त्याबाबतच्या कार्यवाहीच्या माहितीसाठी अपीलकर्ता श्री. दत्तात्रय रामचंद्र माने यांनी विविध कार्यालयांकडे अर्ज केले. परंतु माहिती मिळाली नाही व कार्यवाही झाली नाही, म्हणून श्री. माने यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. माने हे ज्येष्ठ नागरिक (वय ८१ वर्षे) आहेत. शासकीय कामासाठी लागणारा दगड व मुरूम काढण्यासाठी त्यांची मौजे तेरवाड येथील गट नं.५४९.ब पैकी १ हेक्टर ३० आर एवढी जमीन शासनाने दि. २९.१०.१९८६ रोजी संपादन करून सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्याकडे वर्ग केली. 'सार्वजनिक बांधकाम खात्याने दि. २९.१०.१९८६ ते माहे फेब्रुवारी २००२ अखेर दगड व मुरूम काढून शासकीय कामासाठी वापरला आहे. त्यानंतर सदर खाणीतून मुरूम व दगड उपलब्ध होत नसल्याचे कारणावरून खाण वापरासाठी बंद आहे. येथून पुढील कालावधीत तेथे दगड व मुरूम उपलब्ध होण्याची शक्यता नाही. त्यामुळे सदरचे खाणीचे क्षेत्र मूळ मालकास हस्तांतर करण्यास या कार्यालयाची कोणतीही हरकत नाही,' असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी दि. २३.८.२००६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविले. तेव्हापासून आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे जमीन परत मिळण्याबाबत पाठपुरावा करीत आहोत. आपण सध्या भूमिहीन असून उदरनिर्वाहाचे अन्य साधन नाही. संबंधित संचिका विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे दाखल असून ही जमीन आपल्याला परत मिळावी. त्यानंतर या जागेच्या काही भागात ग्रामस्थांसाठी (विशेषतः महिलांसाठी) स्वच्छतागृह बांधण्याचा आपला मानस आहे, असे श्री. माने यांनी विविध निवेदनांमध्ये, पत्रव्यवहारात व आयोगापुढील सुनावणीतही नमूद केले. त्यांनी नमूद केले. श्री. माने यांची मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तिचा समावेश होत नाही. मात्र श्री. माने यांचे वय लक्षात घेता त्यांची जमीन परत मिळण्याची कार्यवाही त्यांना त्वरित कळविली जावयास हवी होती. परंतु सन ऑगस्ट २००६ पासून ते सातत्याने पाठपुरावा करीत असूनही आजतागायत काय कार्यवाही झाली हे त्यांना कळविले जाऊ नये, हे माहिती अधिकाराच्या दृष्टीनेच नव्हे, तर मानवतेच्या दृष्टीकोनातूनही अत्यंत अयोग्य आहे.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर व विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी तातडीने या विषयात लक्ष घालून आवश्यक त्या कार्यवाहीबाबत श्री. माने यांना कळविणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. आपली जमीन परत मिळण्याच्या श्री. दत्तात्रय रामचंद्र माने यांच्या मागणीबाबतच्या प्रशासकीय कार्यवाहीचा संपूर्ण तपशील जिल्हाधिकारी, कोल्हापूर व विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी १५ दिवसांत श्री. माने यांना कळवावा व त्याची प्रत आयोगाला सादर करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४.८.२००९**

प्रत : १. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
२. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. पी.व्ही.कृष्णा रेड्डी — अपीलकर्ता
अे-२, कलावसंत हौसिंग सोसायटी,
८०८, शिवाजीनगर, पुणे-४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. सरव्यवस्थापक
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स कॉपोरेशन लि.,
वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, हौसफिन भवन बिल्डिंग,
वांद्रा, मुंबई ४ ०० ०५१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक, पुणे
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह फायनान्स कॉपोरेशन लि.,
पुणे जिल्हा शाखा कार्यालय,६८५/२, महालक्ष्मी कॉम्प्लेक्स,
१ला मजला, शारदा आर्केड शेजारी, पुणे सातारा रस्ता,
बिबवेवाडी, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.७.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. पी.व्ही.कृष्णा रेड्डी
अे-२, कलावसंत हौसिंग सोसायटी, ८०८, शिवाजीनगर, पुणे-४

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. सरव्यवस्थापक
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स कॉपोरेशन लि.,
वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, हौसफिन भवन बिल्डिंग,
वांद्रा, मुंबई ४ ०० ०५१
श्री. बी. बी. लेकावळे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक, पुणे
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह फायनान्स कॉर्पोरेशन लि.,
पुणे जिल्हा शाखा कार्यालय,६८५/२, महालक्ष्मी कॉम्प्लेक्स,
१ला मजला, शारदा आर्केड शेजारी, पुणे सातारा रस्ता,
बिबवेवाडी, पुणे-३७ श्री. नारायण एच. चौगुले

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

कलाबसंत सह.हौसिंग सोसायटी, पुणे सन १९७२ पासून आजपर्यंतचे ताळेबंद पत्रक, लेजर अकाऊंट, सोसायटीकडून मिळालेल्या पैशाबाबतची कागदपत्रे, तसेच कर्ज फेडीबाबतची माहिती

## विवेचन

आपल्या गृहनिर्माण संस्थेने महाराष्ट्र स्टेट को.ऑप. हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि., मुंबई यांच्याकडे केलेल्या कर्ज फेडीबाबतची सन १९७२ पासूनची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून मिळाली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. पी.व्ही. कृष्णा रेड्डी (वय ८० वर्षे) यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती मिळाली नाही व आपण महाराष्ट्र स्टेट को.ऑप. हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि., मुंबई यांच्या विरूध्द सहकार न्यायालयात दावा केला आहे. त्यात ही माहिती सादर करू, असे जन माहिती अधिकाऱ्यांशी आपण संपर्क साधला असता त्यांनी सांगितले. परंतु न्यायालयात ते हजर झाले नाहीत व माहिती दिली नाही, म्हणून आपण अपील दाखल केले. परंतु अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशा कारणावरुन , प्रथम अपिलानंतर एक महिन्याच्या आतच, श्री. रेड्डी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्त्याने आवश्यक रकमेचा भरणा केला नाही व माहिती दिलेली आहे. असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले. संगणकीकृत हिशेब त्यावेळी नव्हते, म्हणून हस्ताक्षरातील हिशोबाची माहिती श्री. रेड्डी यांना दिली आहे. सन १९७२ पासूनचे लेखाविषयक अभिलेख

मुंबईला मुख्यालयाकडे पाठविले आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, पुणे श्री. नारायण एच. चौगुले यांनी प्रतिपादन केले. अपीलकर्त्याला पैसे भरण्याबाबत व सुनावणीबाबत नोटीस दिली. परंतु त्यांनी पैसेही भरले नाहीत, तसेच ते हजरही राहिले नाहीत. त्यामुळे अपील निकाली काढले, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी सरव्यवस्थापक, दि महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स कॉपोरेशन लि., श्री.बी.बी.लेकावळे यांनी नमूद केले.

श्री. रेड्डी यांनी पत्रव्यवहारात मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती मागितली आहे. कलाबसंत संस्थेने कार्पोरेशनकडे भरणा केलेल्या रकमेची पावती मिळाली नाही, हिशोब जुळत नाही, अशा स्वरूपाची श्री. रेड्डी यांची तक्रार आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. परंतु श्री.रेड्डी यांचे वय लक्षात घेता प्रशासकीय कार्यवाहीच्या मुख्य मागणीच्या अनुषंगाने द्यावयाची माहिती संस्थेच्या पुण्याच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी मुंबईहून मुख्यालयाकडून मागवून एक महिन्यात द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. परंतु ती चुकीची असल्याची तक्रार श्री. रेड्डी यांनी दि. २८.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. आयोगाने दि. ३.११.२००८ च्या पत्रान्वये त्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यांकडून खुलासा मागविला. सन १९९५ पासूनच्या अभिलेखाचा शोध घेऊन सर्व माहिती श्री. रेड्डी यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला दि. २९.११.२००८ रोजी श्री. रेड्डी यांना पाठविलेल्या पत्राच्या प्रतीसह नमूद केले. त्यावर यांची पोचही आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ .८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नेताजी नरोबा ओमासे
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३ /सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.५.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.४.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग यांना शासनाकडून मिळालेले अनुदान, सदर संस्थेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल माहिती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड कोणत्या पध्दतीने झाली आहे व संस्थेमध्ये असणाऱ्या शिक्षकांची नांवे, कोणत्या पेपरला जाहिरात दिली. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.नेताजी नरोबा ओमासे यांनी स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग या शिक्षण संस्थेच्या आश्रम शाळांबाबतची माहिती विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यांच्याकडे मागितली होती. माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी तो अर्ज जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, समर्थ आश्रमशाळा, बेडग यांच्याकडे वर्ग केला. मुख्याध्यापकांनी कळविलेले शुल्क श्री.ओमासे यांनी भरले नाही. श्री.ओमासे यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांनी कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांनी लेखी निवेदनाद्वारे व दि.१४.५.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. श्री.ओमासे सदर कार्यक्रमाला गैरहजर होते. मात्र आपण शुल्क भरुनही आपल्याला कागदपत्रे मिळालेली नाहीत असे त्यांनी अपिलात म्हटले आहे. एका अर्जाबाबत कळविलेले शुल्क रु.१५००/- श्री.ओमासे यांनी मुख्याध्यापकांकडे जमा केले, त्यानुसार माहिती घेऊन जावी असे कळवूनही ते माहिती घेवुन गेलेले नाहीत, असे विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. श्री.ओमासे वेळोवेळी आपल्या कार्यालयात व वरील आश्रमशाळेकडे माहिती मागत असतात. कळविलेले शुल्क भरत नाहीत व माहिती तयार झाल्यावर घेण्यासही जात नाहीत. तसेच वारंवार तक्रार करीत राहतात, असे विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यांनी श्री.ओमासे यांच्या अर्जाच्या तपशिलासह नमूद

केले. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही. माहिती आवश्यक असल्यास नियमानुसार शुल्क आदिबाबतची पूर्तता करुन अपीलकर्त्याने घ्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.तन्मय अरविंद सरदेशपांडे
बिल्डिंग क्र.अ-४, प्लॉट नं.३०३, कुणाल आयकॉन,
पिंपळे सौदागर, औंध कॅम्प, पुणे-४११०२७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तन्मय अरविंद सरदेशपांडे
बिल्डिंग क्र.अ-४, प्लॉट नं.३०३, कुणाल आयकॉन,
पिंपळे सौदागर, औंध कॅम्प, पुणे-४११०२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-५ डॉ.शकुंतला काळे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-५ श्री.एम.एन.बांगर | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>फेब्रुवारी २००६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेतील गणित १ व २, रसायनशास्त्र १ व २ व भौतिकशास्त्र १ व २ या विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत. | |

## विवेचन

फेब्रुवारी २००६ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेतील गणित १ व २, रसायनशास्त्र १ व २ व भौतिकशास्त्र १ व २ या विषयाच्या आपल्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतींची मागणी अपीलकर्ता श्री.तन्मय अरविंद सरदेशपांडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांच्याकडे केली होती. 'शासन पत्र क्र.एस.एस.सी.२००४/(१३९/०४) उमाशि-२, दि.२७ मार्च २००६ नुसार शासनाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००२ नियम क्रमांक ७(ज) नुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ खाली तयार करण्यात आलेल्या नियमानुसार उत्तरपत्रिकेची प्रत देणे ही माहिती गोपनीय असल्याने देता येत नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी अपीलकर्ता श्री.सरदेशपांडे यांना कळविले. त्याविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांच्याकडे

अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय ग्राह्य ठरवून अपिलीय प्राधिकारी यांनी अपील फेटाळले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियम १९७७ मधील तरतुदीनुसार मंडळ नियमावली नियम क्रमांक १०४(३) अन्वये उत्तरपत्रिका अत्यंत गुप्त समजल्या जातात, असे त्यांनी अपीलकर्त्यास कळविले. अपीलकर्त्याचे पालक श्री.अरविंद रामराव सरदेशपांडे यांनी मागविल्यानुसार मंडळाने त्यांनाही हा निर्णय कळविला. त्याविरुध्द श्री.सरदेशपांडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण आपल्या स्वतःच्या उत्तरपत्रिकांच्या प्रमाणित प्रती मागत आहोत. पुनर्विलोकन किंवा तपासणीची मागणी केलेली नाही, त्यामुळे आपल्याला छायांकित प्रती व उत्तरपत्रिका पहायला मिळाव्यात, अशी मागणी अपीलकर्त्याने आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात केली आहे.

आयोगाच्या दि.१२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंनी आधीचीच भूमिका 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविली. त्यामुळे उभय बाजूंचे एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या दिवशीच आपल्याला सुनावणीचे पत्र मिळाल्यामुळे आपल्याला हजर राहता आले नाही, असे अपीलकर्त्याने नंतर दि.१८.१२.२००८ रोजी कळविले.

उत्तरपत्रिका या गोपनीय असल्यामुळे त्याच्या प्रमाणित प्रती देता येत नाहीत असे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. अपीलकर्त्याने त्यानंतरही केलेल्या पत्रव्यवहारावरही वेळोवेळी त्यांना उत्तर देण्यात आले, असे जन माहिती अधिकारी श्री.एम.एन.बांगर व अपिलीय प्राधिकारी डॉ.शकुंतला काळे यांनी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याचा पत्रव्यवहार व त्याला दिलेली उत्तरे यांच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

संबंधित परीक्षा फेब्रुवारी २००६ मध्ये झालेली असून अपीलकर्त्याचा माहिती-मागणीचा मूळ अर्ज दि.१.९.२००६ चा आहे व आयोगाकडील अपील दि.८.१.२००७ रोजी केलेले (प्राप्त दि.१०.१.२००७) आहे. मंडळाच्या नियमानुसार उत्तरपत्रिकेच्या प्रती देता येत नसल्या तरी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील पारदर्शकतेचे तत्त्व व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २२ मध्ये अधिभावी परिणामाची तरतूद लक्षात घेता उत्तरपत्रिका गोपनीय मानता येणार नाहीत. मात्र संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतरच्या दरम्यानचा कालावधी लक्षात घेता अपीलकर्त्याला आता आवश्यक वाटत असल्यास उत्तरपत्रिका जतनाचया कालावधीनुसार त्याच्या उत्तरपत्रिकांचे निरीक्षण करु द्यावे, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. परंतु त्यानुसार कार्यवाही झाली नसल्याचे अपीलकर्ता श्री.तन्मय अरविंद सरदेशपांडे यांनी आयोगाला कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांनी याबाबतचा खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्याने मागणी केलेल्या विषयांच्या उत्तरपत्रिका अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याच्या आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांनी आयोगाला दि.१०.८.२००९ पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३.८.२००९

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहे:

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/ २००९ / सातारा | सौ. सुनिता प्रकाश पोळ प्लॉट क्र.२४, कर्मवीर हौसिंग कॉलनी, राधिका पॅलेस रोड, सातारा. | जिल्हा कुटुंब कल्याण कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | डॉ.मोहिते जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सातारा यांच्या परदेश दौ-याबाबत | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. अपीलकर्त्यांने सातत्याने विशिष्ट अधिका-याबाबत माहिती अर्ज केल्याचे या, तसेच यापूर्वीच्या अपिलांवरुन स्पष्ट होते. यात माहितीच्या मागणीपेक्षा संबंधितांविरुध्दच्या कृतीचा भाग दिसतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा हा योग्य वापर नाही. |
| २ | २५/ २००९ / सातारा | सौ. सुनिता प्रकाश पोळ प्लॉट क्र.२४, कर्मवीर हौसिंग कॉलनी, राधिका पॅलेस रोड, सातारा. | जिल्हा कुटुंब कल्याण कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | १) डॉ. मोहिते यांचा पासपोर्ट<br>२) PHC मधून श्रीमती गोंजारी (ANM) बाबत DHO कार्यालयास झालेला पत्रव्यवहार<br>३) डॉ.मोहिते DHO झाल्यापासून रु.५०,०००/- वरील सर्व Equipments च्या खरेदीच्या प्रती.<br>४) डॉ.पी.एस.पोळ यांच्या दिनांक १२.०५.०८ च्या तक्रार अर्जावर झालेल्या चौकशी अहवालाची लेखी प्रत | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०४/ २००९ / सातारा | श्री. संभाजी आबाजी गाडे ३७१/अ, रविवार पेठ, मु.पो.फलटण, जि.सातारा | जिल्हा प्रकल्प अधिकारी, सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा | फलटण नगरपरिषद निधी वापराबाबत खुलासेवजा व प्रश्नार्थक माहिती | खुलासा, भाष्य, गृहितावर आधारित संकल्पित कारवाईची माहिती इ. बाबी या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. यास्तव अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ४ | १०५/ २००९ / सातारा | श्री. शेख मुसा गुलाब नायकवडी ९३/४, मंगळवार पेठ, कराड, जि.सातारा | नगर अभियंता, कराड नगरपरिषद, जि.सातारा | मुख्याधिकारी कराड नगरपरिषद, जि.सातारा | परवाना नं१४१/२००२, सिटी सर्व्हे नं.१८८, टि.पी.नं.३८९/३४ इ. इमारत मंजूरीबाबत असे एकूण ७ मुद्दे | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच आयोगाकडे केलेल्या अपिलातील माहितीची मागणी मूळ अर्जातील मागणीपेक्षा भिन्न आहे हे नियमानुसार योग्य नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ४ ही अपीले (अपील क्र.२४/२००९/सातारा, २५/२००९/सातारा, १०४/२००९/सातारा, व १०५/२००९/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०८-२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहे:

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/ २००९ / सातारा | सौ. सुनिता प्रकाश पोळ प्लॉट क्र.२४, कर्मवीर हौसिंग कॉलनी, राधिका पॅलेस रोड, सातारा. | जिल्हा कुटुंब कल्याण कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | डॉ.मोहिते जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सातारा यांच्या परदेश दौ-याबाबत | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. अपीलकर्त्याने सातत्याने विशिष्ट अधिका-याबाबत माहिती अर्ज केल्याचे या, तसेच यापूर्वीच्या अपिलांवरुन स्पष्ट होते. यात माहितीच्या मागणीपेक्षा संबंधितांविरुध्दच्या कृतीचा भाग दिसतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा हा योग्य वापर नाही. |
| २ | २५/ २००९ / सातारा | सौ. सुनिता प्रकाश पोळ प्लॉट क्र.२४, कर्मवीर हौसिंग कॉलनी, राधिका पॅलेस रोड, सातारा. | जिल्हा कुटुंब कल्याण कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | १) डॉ. मोहिते यांचा पासपोर्ट २) PHC मधून श्रीमती गोंजारी (ANM) बाबत DHO कार्यालयास झालेला पत्रव्यवहार ३) डॉ.मोहिते DHO झाल्यापासून रु.५०,०००/- वरील सर्व Equipments च्या खरेदीच्या प्रती. ४) डॉ.पी.एस.पोळ यांच्या दिनांक १२.०५.०८ च्या तक्रार अर्जावर झालेल्या चौकशी अहवालाची लेखी प्रत | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०४/ २००९ / सातारा | श्री. संभाजी आबाजी गाडे ३७१/अ, रविवार पेठ, मु.पो.फलटण, जि.सातारा | जिल्हा प्रकल्प अधिकारी, सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | उपजिल्हाधिकारी सातारा, जि.सातारा | फलटण नगरपरिषद निधी वापराबाबत खुलासेवजा व प्रश्नार्थक माहिती | खुलासा, भाष्य, गृहितावर आधारित संकल्पित कारवाईची माहिती इ. बाबी या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. यास्तव अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ४ | १०५/ २००९ / सातारा | श्री. शेख मुसा गुलाब नायकवडी ९३/४, मंगळवार पेठ, कराड, जि.सातारा | नगर अभियंता, कराड नगरपरिषद, जि.सातारा | मुख्याधिकारी कराड नगरपरिषद, जि.सातारा | परवाना नं१४१/२००२, सिटी सर्व्हे नं.१८८, टि.पी.नं.३८९/३४ इ. इमारत मंजूरीबाबत असे एकूण ७ मुद्दे | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच आयोगाकडे केलेल्या अपिलातील माहितीची मागणी मूळ अर्जातील मागणीपेक्षा भिन्न आहे हे नियमानुसार योग्य नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

<u>आदेश</u>

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ४ ही अपीले (अपील क्र.२४/२००९/सातारा, २५/२००९/सातारा, १०४/२००९/सातारा, व १०५/२००९/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — seal)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०८-२००९

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोरं माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६१/ २००९ / सातारा | श्री. संतोष बबन भोसले रा. लिंब, ता.व जि.सातारा | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा | भिमाबाई आंबेडकर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, मौजे गोडोली, ता.व जि.सातारा या संस्थेसंदर्भातील माहिती | जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ३०.०४.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती दिली आहे. |
| २ | ३६२/ २००९ / सातारा | श्री. श्रीरंग भाऊ थोरात मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | तहसीलदार कराड, जि.सातारा | सर्व्हे नंबरच्या एका बाजूच्या सरबांधाने सरकारी रस्ता असताना त्याच्या दुस-या सरबांधाने रस्ता देण्याच्या अधिकाराबाबत खुलासा | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. तसेच अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ३ | ३६३/ २००९/ सातारा | श्री. दत्तात्रय सावळा लष्कर जिद्द निवास मु.पो.काशिळ, ता.व जि.सातारा | प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे | सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे | वरिष्ठ लिपिक या पदाच्या भरती करिता आलेले एकूण अर्ज व त्यासंदर्भात एकूण ९ मुद्दे | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| ४ | ३६५/ २००९ / सातारा | श्री. आनंदराव धोंडीबा गावडे मु.बेंडवाडी, पो.आसनगाव, ता.व जि.सातारा | ग्रामसेवक बेंडवाडी, पो.आसनगाव, ता.व जि.सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा, जि.सातारा | ग्राम पंचायतीचे जमा खर्च पत्रक, बी.पी.एल गटाचे जमा- खर्चाचे विवरण पत्र | १) अपीलकर्त्याने अपीलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णयाच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांत आयोगास सादर करावा. |
| ५ | ३६६/ २००९ / सातारा | श्री. वसंत बंडोबा पाटील १०६-अ, सोमवार पेठ, सातारा | माहिती अधिकारी वसुली विभाग, सातारा नगरपरिषद, सातारा | मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा | घर नं.४४६/४४७/१ या मिळकतीचे घरपट्टी सेवानिवृत्ती वेतनातून वसूल केल्याप्रकरणी माहिती | अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली एकूण ५ अपिले (अपील क्र.२६१/२००९/सातारा, ३६२/२००९/सातारा, ३६३/२००९/सातारा, ३६५/२००९/सातारा, व ३६६/२००९/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्र. ३६५/२००९/सातारा प्रकरणी निष्कर्षात नमूद केल्यानुसार कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०८-२००९

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २६१/ २००९ / सातारा | श्री. संतोष बबन भोसले रा. लिंब, ता.व जि.सातारा | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा | भिमाबाई आंबेडकर मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, मौजे गोडोली, ता.व जि.सातारा या संस्थेसंदर्भातील माहिती | जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ३०.०४.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती दिली आहे. |
| २ | ३६२/ २००९ / सातारा | श्री. श्रीरंग भाऊ थोरात मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | तहसीलदार कराड, जि.सातारा | सर्व्हे नंबरच्या एका बाजूच्या सरबांधाने सरकारी रस्ता असताना त्याच्या दुस-या सरबांधाने रस्ता देण्याच्या अधिकाराबाबत खुलासा | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. तसेच अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ३ | ३६३/ २००९/ सातारा | श्री. दत्तात्रय सावळा लष्कर जिद्द निवास मु.पो.काशिळ, ता.व जि.सातारा | प्रशासकीय अधिकारी, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे | सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे | वरिष्ठ लिपिक या पदाच्या भरती करिता आलेले एकूण अर्ज व त्यासंदर्भात एकूण ९ मुद्दे | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |
| ४ | ३६५/ २००९ / सातारा | श्री. आनंदराव धोंडीबा गावडे मु.बेंडवाडी, पो.आसनगाव, ता.व जि.सातारा | ग्रामसेवक बेंडवाडी, पो.आसनगाव, ता.व जि.सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा, जि.सातारा | ग्राम पंचायतीचे जमा खर्च पत्रक, बी.पी.एल गटाचे जमा- खर्चाचे विवरण पत्र | १) अपीलकर्त्याने अपीलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णयाच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांत आयोगास सादर करावा |
| ५ | ३६६/ २००९ / सातारा | श्री. वसंत बंडोबा पाटील १०६-अ, सोमवार पेठ, सातारा | माहिती अधिकारी वसुली विभाग, सातारा नगरपरिषद, सातारा | मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा | घर नं. ४४६/४४७/१ या मिळकतीचे घरपट्टी सेवानिवृत्ती वेतनातून वसूल केल्याप्रकरणी माहिती | अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली एकूण ५ अपिले (अपील क्र.२६१/२००९/सातारा, ३६२/२००९/सातारा, ३६३/२००९/सातारा, ३६५/२००९/सातारा, व ३६६/२००९/सातारा ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्र. ३६५/२००९/सातारा प्रकरणी निष्कर्षात नमूद केल्यानुसार कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बापूराव विठ्ठल तांबे
मु.पो.पणदरे, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व
भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई-४०००४९ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक,
वसंतराव नाईक विमुक्त जाती व
भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६२५ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. नाही. |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता**
**अपिलीय प्राधिकारी** तथा
**जन माहिती अधिकारी** तथा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २०००-२००१ या कालावधीत कर्ज मागणी केली होती. त्यानुसार लागणारे जामीनदार दिले होते परंतु मी कोणत्याही प्रकारे कर्ज घतलेले नाही. तरी मी दिलेला जामीनदार श्री.शिवाजी जगदेव टेंगळे यांचे पगारातून महामंडळाने कर्जाचा हप्ता कोणत्या हेतूने कापला, सदर प्रकरण मंजूर वा नामंजूर याबाबत कळवावे, आपले मंडळामार्फत वरील कालावधीत किती प्रकरणे मंजूर करुन वाटप करण्यात आले. |
|---|---|

## विवेचन

आपण कर्जाची मागणी करुन आवश्यक जामीन दिल्यानंतरही कर्ज मंजूर केले नाही, कर्ज घेतलेले नसतानाही आपण नमूद केलेल्या जामीनदाराच्या पगारातून हप्ता कोणत्या हेतूने कापण्यात आला, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.बापूराव विठ्ठल तांबे यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून कारवाई करावी, अशी मागणी श्री.तांबे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांच्याकडून आयोगाने दि.१६.२.२००९च्या पत्रान्वये अहवाल मागविला होता. जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांनी दि.३.३.२००९ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. श्री.तांबे यांनी सन २०००-२००१ पासून या स्वरुपाचा पत्रव्यवहार विविध पातळ्यांवर केला आहे. मे १९९७ मध्ये 'बांगडी व सौंदर्यप्रसाधन' या व्यवसायासाठी त्यांना दिलेले कर्ज, त्याना त्यावेळी जामीन असलेले श्री.शिवाजी जगदेव टेंगळे यांच्या वेतनातून चुकून झालेली हप्त्याची कपात व त्या अनुषंगाने झालेली पुढील कार्यवाही व श्री.तांबे यांना पुन्हा कर्ज न

देण्याचे कारण आदी सर्व त्यांना माहिती वेळोवेळी कळविण्यात आलेली आहे. कुटुंबामधील एकाच व्यक्तीला एकदाच कर्ज दिले जाते, ही महामंडळाच्या अहवालातील बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, पुणे यांनीही श्री.तांबे यांची तक्रार दि.२४.१०.२००८ रोजी निकाली काढली आहे. या बाबी स्पष्ट करणाऱ्या व श्री.तांबे यांना वेळोवेळी पाठविण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रती जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, पुणे श्री.रा.म.चांदेकर यांनी अहवालासोबत सादर केल्या. आपल्या महामंडळाकडून एका व्यक्तीला एकदाच कर्ज दिले जाते, हे स्पष्ट समजावून सांगितल्यावरदेखील पुन्हा कर्ज मिळविण्याच्या हेतूने श्री.बापूराव विठ्ठल तांबे हे वारंवार पत्र्यव्यवहार करुन शासकीय यंत्रणेला अनाठायी वेठीस धरत आहेत, असे श्री.रा.म.चांदेकर यांनी अहवालात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित यांच्या जिल्हा व्यवस्थापकांनी सादर केलेला अहवाल लक्षात घेता अपीलकर्त्याला सर्व माहिती, माहितीच्या अधिकारा व्यतिरिक्तच्या पत्रव्यवहारातही देण्यात आलेली आहे. या स्थितीत माहितीच्या अधिकारातील त्याच बाबतीतील अर्ज व अपील दखल घेण्यायोग्य ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मधील प्रपत्रात नोंदी विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०७, २७११, २७१२, २७१३, २७१४, २७१५, २७१६ व २७२१/ पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजाराम भाऊ ढगे<br>मु.कोंडीवडे, पो.भोयरे, आ. मावळ, ता.मावळ, जि.पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय मावळ,<br>ता.मावळ, जि.पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार,<br>तहसील कार्यालय मावळ,<br>ता.मावळ, जि.पुणे |
| ५ | **मूळ अर्जातील माहितीची मागणी** :- खालील फेरफारांमधील संबंधित घटकांना काढलेल्या नोटिसा , त्यांचे घेतलेले जाबजबाब,चालविलेल्या तक्रारींच्या अभिलेखाच्या प्रती, फेरफारान्वये जमीन हस्तांतरण करणारे, जमीन विक्री करणारे व खरेदीदार यांना काढलेल्या नोटिसा इ. अनुषंगिक मुद्दयांबातची माहिती<br>**अपील क्रमांक २७०७ :-** मौजे कशाळ, ता.मावळ गावातील फेरफार क्र.५२९, ८६८, ९४५, ६७५, ६८१, ४६७, ७०८<br>**अपील क्रमांक २७११ :-** मौजे कोंडीवडे येथील फेरफार क्र.०१, ४१३, ०३, ३८१, १७४<br>**अपील क्रमांक २७१२ :-** मौजे कशाळ येथील फेरफार क्र.६५२६, ८८३, ३६२, ९०२, ५०६,१३९<br>**अपील क्रमांक २७१३** :- मौजे कोंडीवडे फेरफार क्र.४६२, ३३३ व ३०१<br>**अपील क्रमांक २७१४ :-** मौजे कशाला फेरफार क्र.३४०, ३६६ व १०३<br>**अपील क्रमांक २७१५ :-** मौज कोंडीवडे येथील फेरफार क्र.०१, ४४, ३५३, ४९८ व ४९७<br>**अपील क्रमांक २७१६ :-** मौजे किवळे येथील गट नं.५१ ब बाबत फेरफार क्र.२६१, १४४, १७९<br>**अपील क्रमांक २७२१ :-** मौजे कशाला येथील फेरफार क्र.३८१, ३४० व ३४१ | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. राजाराम भाऊ ढगे यांनी सन १९९५ ते ऑगस्ट २००८ या काळातील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वडगाव मावळ यांनी ती न दिल्याने श्री.ढगे यांनी अपिलीय

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास कोणीही हजर नसल्याने दि. १९.११.०८ रोजी सदर अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४८/सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ईश्वर अंकुश शेलार<br>निराळे वस्ती, गौरा नगर, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहायक आयुक्त (वि)<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. ईश्वर अंकुश शेलार यांनी अनिधिकृत व अधिकृत खोकेधारकांच्या यादीचा तपशील, तसेच अधिकारी व कर्मचारी भ्रष्ट असल्याचा आरोप करून त्यांच्याबाबत माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सबंधित धारिकाअवलोकनासाठी उपलब्ध करून दिल्या. ऊर्वरित माहिती नंतर देण्यात आली. हॉटेल्स वगैरेबाबतची नेमकी माहिती मागितल्यास ती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे. अनधिकृत खोकेधारकांची माहिती मिळावी. अन्य सर्व माहिती आपण महानगरपालिकेमध्ये जाऊन घेतली असून त्याबद्दल समाधानी आहोत, असे निवेदन अपीलकर्ता यांनी दि.२६.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३१.०८.२००९**

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी हणमंत सुगरे
रा. सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (प्राथमिक),सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १८.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शिवाजी हणमंत सुगरे
रा. सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री. पी. एस. मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
(प्राथमिक),सोलापूर श्रीः एस. डी. कदम

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सन १९९८ पासून श्री. नागणे व श्री. हक्के मुख्याध्यापकांच्या वार्षिक वेतनवाढी पास करून बिले पास करण्यास संस्थेने सादर केलेले ठराव, वेतनवाढीचा आदेश, वेतनवाढीच्या बिलाची नक्कल, ठराव नसल्यास कोणत्या आदेशाच्या आधारे वेतनवाढ बिले पास केली त्याची सविस्तर माहिती, तसेच सन २००६ मार्च पर्यंतच्या शाळेच्या सर्व वेतन व पुरवणी बिलाच्या नकला, सौ उज्वलाताई शिंदे नांमातरण झालेनंतर या नावाने आलेल्या वेतन बिलाच्या नकला व नामांतर झालेल्या आदेशाची नक्कल

## विवेचन

बाल विकास मंदिर, सलगरवाडी या शाळेतील शिक्षकांच्या वेतनाच्या संदर्भात अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (प्राथमिक), सोलापूर यांच्याकडे माहिती मागितली होती. संबंधित माहिती संस्थास्तरावरील असल्याने शाळेच्या मुख्याध्यापकांकडून घ्यावी, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. सुगरे यांना कळविले. परंतु संबंधित विभागाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची आपण मागणी केली असून अनियमितता, गैरकारभार व भ्रष्टाचार उघड होऊ नये, म्हणून माहिती नाकारली आहे, या कारणावरून श्री. सुगरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. योग्य ते शुल्क भरून माहिती घ्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. माहिती निःशुल्क देणे आवश्यक असल्याची जाणीव आपण स्मरण पत्राद्वारे दिल्यानंतरही आपल्याला शुल्क भरण्यास कळविले गेले, असे श्री. सुगरे यांनी अपील अर्जात व लेखी निवेदनात नमूद केले. तसेच दि. १८.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांची अडचण विचारात घेऊन आपण निर्णय दिला होता, त्यानुसार शुल्क भरून माहिती घेऊन जाण्याबाबत श्री. सुगरे यांना चार पत्रे पाठविली. परंतु त्यांनी माहिती नेली नाही. उलट, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहयोगी यांनी नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी रू.५०००/- आपल्याला द्यावे, अशी मागणी श्री. सुगरे यांनी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या दि. १८.६.२००८ च्या निवेदनातही केली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. एस.डी. कदम व अपिलीय प्राधिकारी श्री. पी.एस.मोरे यांनी नमूद केले. माहिती मिळविणे हा श्री. सुगरे यांचा हेतू नसून केवळ त्रास देण्याच्या दृष्ट हेतूने सवयीप्रमाणे माहितीची मागणी करीत असतात. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी त्यांनी ही माहिती स्वीकारली, असेही जन माहिती अधिंकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. श्री. सुगरे यांनी निवेदनामध्ये विविध स्वरूपाचे आरोप केले असून त्याला पूरक अशी कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. मात्र कार्यालयाच्या अभिलेखावर असलेली माहिती त्या त्या कार्यालयाने दिली पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ .८.२००९**

साखर (अर्थ), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शास्ती करावी या मागणीसाठी अपीलकर्ता श्री. शिवाजी शामराव काशीद यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. काशीद यांचा दि. ३०.९.२००६ चा अर्ज दि. ११.१०.२००६ रोजी प्राप्त झाला. आपल्या कार्यालयाच्या स्तरावर ही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे दि. २०.१०.२००६ रोजी अर्ज कारखान्याकडे वर्ग करून माहिती देण्याची सूचना कारखान्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक यांना देण्यात आली. कार्यकारी संचालकांनी श्री. काशीद यांना शुल्क भरण्याबाबत दि. १६.११.२००६ रोजी कळविले. दि. १.१२.२००६ रोजी त्यांनी शुल्क भरले व त्याच दिवशी त्यांना माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, साखर (अर्थ), साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रपत्रात नमूद केले व पूरक कागदपत्रांसह सुनावणीत निवेदन केले, अपीलकर्त्याने ते मान्य केले. मात्र साखर आयुक्तांनी सन १९९६ ते २००१ या काळात ऊस बिलातील कपातीबाबत काढलेल्या आदेशांच्या प्रती आपण मागितल्या होत्या. साखर आयुक्त कार्यालयात त्या उपलब्ध नाहीत, हे योग्य नाही. त्या कार्यालयाचा आदेश त्याच कार्यालयात उपलब्ध होणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री. काशीद यांनी केले. त्यांचे हे म्हणणे रास्त आहे. साखर आयुक्तालयाने जारी केलेल्या आदेशाची प्रत ही माहिती कारखाना स्तरावरील म्हणता येणार नाही. कार्यालयातून अथवा कारखान्याकडून ती मिळवून देणे ही साखर आयुक्तांच्या जन माहिती अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे, याची जाणीव साखर आयुक्तालयातील जन माहिती अधिकाऱ्यांना देण्यात येत आहे. मात्र प्रस्तुत अपिलात ही माहिती कारखान्याकडून मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व अपीलकर्त्याने शुल्क भरल्यानंतर कारखान्याने त्वरित माहिती दिली आहे, त्यामुळे विलंबाबाबतची तक्रार योग्य ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.८.२००९

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे अपीलकर्ता श्री. नानासाहेब दिनकर पवार, वरद विनायक गार्डन, ३ रा मजला, फेज-१, विसावा पार्क, सातारा यांनी दाखल केलेले खालील अपील निकाली काढण्यात येत आहे:

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३८८ / सातारा | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, सातारा शहर उप विभाग, सातारा | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, विभागीय कार्यालय, सातारा | सन १९९० ते २००४ या कालावधीतील वीज कनेक्शन क्र.आय २२११० (१९०५६०२३२२३७) संदर्भात १९९० पासून पी.डी. रजिस्टर, एन.एस.सी. रिपोर्ट, मीटर कार्ड रजिस्टर इत्यादींच्या प्रती | आयोगाच्या दिनांक १५.०१.२००९ च्या पत्रास अनुलक्षून अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २९.०१.२००९ च्या पत्रान्वये केलेला खुलासा योग्य आहे व तो मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्ते श्री.नानासाहेब पवार यांना त्यांची थकबाकी १५ वर्षे प्रलंबित असून देखील ३ वेळा वीज कनेक्शन देण्यात आले होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा दुरुपयोग करुन वेगवेगळी माहितीची वारंवार मागणी करुन थकबाकी वसुलीची प्रक्रिया लांबणीवर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | टाकणे शक्य झाल्यास ती बुडविणे हा अपीलकर्त्याचा उद्देश असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी खुलाशात म्हटले आहे. अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०८.२००९